सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधी व न्याय विभाग**

**सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१**

# महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५

**( दिनांक १ फेब्रुवारी १९८९ पर्यंत सुधारलेला )**

MAHARASHTRA ACT No. XLI OF 1965

# THE MAHARASHTRA SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION BOARDS ACT, 1965

*(As modified up to 1st February 1989)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, सरकारी मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित.

१९८९

[ किंमत रु. २.५० ]

# महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५

## अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २. | व्याख्या | १ |
| ३. | राज्य आणि विभागीय मंडळांची स्थापना | ४ |
| ३अ. | पहिल्या अनुसूचीत सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार | ४ |
| ४. | राज्य मंडळ कायद्याने संस्थापित करणे | ४ |
| ५. | राज्य मंडळाची रचना | ४ |
| ६. | विभागीय मंडळांची रचना | ७ |
| ७. | मंडळांच्या सभापतींचा पदावधी व सेवेच्या शर्ती | ८ |
| ८. | मंडळांच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते | ९ |
| ९. | सभापती व सदस्य यांची निरर्हता | ९ |
| १०. | निरर्हतेमुळे सभापतीची किंवा सदस्याची जागा रिकामी होणे | १० |
| ११. | परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याची जागा रिकामी होणे | १० |
| १२. | रिकाम्या जागेबाबतच्या प्रश्नाचा निर्णय | १० |
| १३. | रिकामी जागा अधिसूचित करणे | १० |
| १४. | सदस्याचा राजीनामा | १० |
| १५. | सदस्यास काढून टाकणे | १० |
| १६. | मंडळाच्या सभा | ११ |
| १७. | तज्ज्ञांना आणि अधिकाऱ्यांना सभेस बोलाविण्याचा अधिकार | ११ |
| १८. | राज्य मंडळाचे अधिकार व कर्तव्ये | ११ |
| १९. | विभागीय मंडळाचे अधिकार व कर्तव्ये | १४ |
| २०. | मंडळांच्या सभापतींचे अधिकार व कर्तव्ये | १५ |
| २१. | सचिव, सह-सचिव व सहायक सचिव यांची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये | १६ |
| २२. | मंडळांचे इतर अधिकारी व कर्मचारी | १६ |
| २३. | समित्यांची नेमणूक | १६ |
| २४. | नैमित्तिकरीत्या रिकाम्या झालेल्या जागा | १७ |

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| २५. | रिकाम्या जागांमुळे किंवा रचनेतील दोषांमुळे कृती किंवा कार्यवाह्या विधिअग्राह्य न होणे. | १७ |
| २६. | राज्य मंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा व त्याची गुंतवणूक .. .. .. | १७ |
| २७. | सभापती, सचिव, सह-सचिव आणि सहायक सचिव यांचे वेतन, निवृत्तिवेतन वगैरेचा खर्च राज्य मंडळाने निधीतून देणे. .. .. | १८ |
| २८. | निधीचे सर्वसाधारण उपयोजन .. .. .. .. .. | १८ |
| २९. | निधीतून पैसा कसा काढावा .. .. .. .. .. | १८ |
| ३०. | विभागीय मंडळांस नियत वाटपप्राप्त रक्कम .. .. .. .. | १८ |
| ३१. | वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे .. .. .. .. | १८ |
| ३२. | वार्षिक लेखे व लेखापरीक्षा .. .. .. .. .. | १८ |
| ३२अ. | निरीक्षण व चौकशी .. .. .. .. .. .. | १९ |
| ३३. | मंडळांनी पुरवावयाची माहिती, विवरणपत्रे इत्यादी .. .. .. | १९ |
| ३४. | निदेश काढण्याचे राज्य शासनाचे अधिकार .. .. .. .. | १९ |
| ३५. | मंडळाकडे किंवा समितीकडे प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत | २० |
| ३६. | विनियम करण्याचा राज्य मंडळाचा अधिकार .. .. .. .. | २० |
| ३७. | पहिले विनियम .. .. .. .. .. .. .. | २१ |
| ३८. | उप-विधी करण्याचा राज्य मंडळाचा अधिकार .. .. .. .. | २२ |
| ३९. | शंका उपस्थित झाल्याच्या बाबतीत निर्वचन .. .. .. .. | २२ |
| ४०. | निरसन व व्यावृत्ती .. .. .. .. .. .. | २२ |
| ४१. | विवक्षित अधिनियमितींच्या सुधारणा .. .. .. .. .. | २३ |
| ४२. | अडचणी दूर करण्याचा अधिकार .. .. .. .. .. | २४ |
| | पहिली अनुसूची .. .. .. .. .. .. .. | २४ |
| | दुसरी अनुसूची .. .. .. .. .. .. .. | २५ |

# सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ [१]

# महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५

राज्यपाल यांची अनुमती दिनांक १० सप्टेंबर १९६५ रोजी मिळाली; ही अनुमती दिनांक १३ सप्टेंबर १९६५ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार मध्ये प्रथम प्रसिध्द करण्यात आली.

या अधिनियमात खालील अधिनियमाअन्वये सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६. (१५-६-१९७७)*

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.† (६-११-१९८५)*

**महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक [२][व उच्च माध्यमिक] शिक्षणासंबंधीच्या विवक्षित बाबींचे विनियमन करण्यासाठी राज्य मंडळे व विभागीय मंडळे स्थापन करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक [३][व उच्च माध्यमिक] शिक्षणासंबंधीच्या विवक्षित बाबींचे विनियमन करण्यासाठी, राज्य मंडळ व विभागीय मंडळे स्थापन करण्यासाठी आणि यात यापुढे दिलेल्या इतर प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र माध्यमिक [४][व उच्च माध्यमिक] शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल ; आणि या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा [५]तारखेस अंमलात येतील.

व्याख्या.

२. संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "नेमलेला दिवस" म्हणजे, कलम १, पोट-कलम (३) खाली या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी ज्या तारखेस अंमलात येतील ती तारीख ;

(ब) "मंडळ" म्हणजे, यथास्थिति राज्य मंडळ किंवा विभागीय मंडळ ;

(क) "उपविधी" म्हणजे, राज्य मंडळाने कलम ३८ खाली तयार केलेले उपविधी ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९६५, भाग पाच, असाधारण, पृष्ठ ३७१–७२ (इंग्रजी) पहा.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] १ जानेवारी १९६६. पहा—शासकीय अधिसूचना, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्रमांक एसएससी-१७६५-जी-(१), दिनांक २० डिसेंबर १९६५.

*ही तारीख अधिनियमाचा प्रारंभ दर्शविते.

†सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ११ अन्वये सन १९८५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ निरसित करण्यात आला.

(ड) "संबंधित विभागीय मंडळ" म्हणजे, महाराष्ट्र माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाच्या संबंधात, या अधिनियमाखाली पुणे विभागाकरिता स्थापन करण्यात आलेले मंडळ आणि विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळाच्या संबंधात, नागपूर विभागाकरिता याप्रमाणे स्थापन करण्यात आलेले मंडळ ;

[1][ (ई) "विभाग" म्हणजे, या अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक विभागामध्ये समाविष्ट असलेली क्षेत्रे ; ]

(फ) "विभागीय मंडळ" म्हणजे, या अधिनियमाखाली विभागाकरिता स्थापन केलेले मंडळ;

(ग)* "अंतिम परीक्षा" म्हणजे, राज्य मंडळाच्या वतीने विभागीय मंडळ यथास्थिति [2][माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्याच्या अखेरीस] चालवील अशी एक किंवा अधिक परीक्षा ;

(ह) "मुख्याध्यापक" किंवा "मुख्याध्यापिका" [3][किंवा प्राचार्य] म्हणजे, विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या माध्यमिक शाळेच्या [3][किंवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या] शिक्षकवर्गाचा प्रमुख—मग तो कोणत्याही प्रकारे पदनिर्देशित केलेला असो ;

[4][ (ह-१) "उच्च माध्यमिक शिक्षण" म्हणजे, माध्यमिक शिक्षणाच्या लगतनंतरचे व राज्यात कायद्याने स्थापन केलेल्या विद्यापीठांकडून नियंत्रित करण्यात येणाऱ्या शिक्षणाच्या लगतपूर्वी येणारे असे सर्वसाधारण, तांत्रिक, व्यावसायिक किंवा विशेष शिक्षण (यात त्याच्या कोणत्याही संयुक्त पाठ्यक्रमाचा समावेश होतो) ; ]

(आय) "परिसंस्था" म्हणजे, [5][माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण किंवा दोन्ही] देणारी परिसंस्था ;

[6][ (आय-१) "कनिष्ठ महाविद्यालय" म्हणजे, जेथे उच्च माध्यमिक शिक्षण पाठ्यक्रमाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षाचे किंवा दोहोंचे शिक्षण देण्यात येते अशी परिसंस्था ; ]

(ज) "विहित" म्हणजे, विनियमांद्वारे विहित केलेले ;

(के) "प्राथमिक शिक्षण" म्हणजे, राज्य शासनाने याबाबतीत व्याख्या केल्याप्रमाणे प्राथमिक शाळेत दिले जाणारे शिक्षण किंवा त्याच्याशी तुल्य असलेले शिक्षण ;

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ (अ) अन्वये मूळ खंड (ई) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[2] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ५ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) अन्वये खंड (ह-१) समाविष्ट करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ड) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ई) अन्वये खंड (आय-१) समाविष्ट करण्यात आला.

(ल) "विभागीय मंडळाने मान्यता दिलेली" याचा माध्यमिक शाळा [1][ किंवा कनिष्ठ महाविद्यालय] यांच्या संदर्भातील अर्थ असा की, विभागीय मंडळाने आपल्या विशेषाधिकारांचा लाभ करुन देण्याच्या प्रयोजनार्थ मान्यता दिलेली आणि "शिक्षण विभागाने मान्यता दिलेली" म्हणजे, माध्यमिक शाळा संहितेअन्वये [2][किंवा राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या इतर कोणत्याही प्रशासकीय आदेशान्वये] एकतर शिक्षण संचालनालयाने किंवा तंत्र शिक्षण संचालनालयाने मान्यता दिलेली ; आणि "मान्यता" या शब्दाचे व्याकरणिक फेरफार व समानार्थी शब्द यांचा त्यानुसार अर्थ लावण्यात येईल ;

(म) "विनियम" म्हणजे, राज्य शासनाने कलम ३७ खाली केलेले आणि राज्य मंडळाने कलम ३६ खाली केलेले विनियम ;

[3] *        *        *        *        *

(ओ) "माध्यमिक शिक्षण" म्हणजे, किशोरावस्थेच्या काळाच्या गरजा भागविण्यासाठी योजिलेले आणि प्राथमिक शिक्षणाच्या लगतनंतर व [4][उच्च माध्यमिक शिक्षणाच्या] लगतपूर्वी देण्यात येणारे सर्वसाधारण, तांत्रिक, व्यावसायिक किंवा विशेष शिक्षण (यांत त्याच्या कोणत्याही संयुक्त पाठ्यक्रमाचा समावेश होतो) ;

(प) "राज्य मंडळ" म्हणजे, या अधिनियमाखाली स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य माध्यमिक [5][आणि उच्च माध्यमिक] शिक्षण मंडळ ;

[6][ (प-१) "माध्यमिक शाळा" म्हणजे, जेथे माध्यमिक शिक्षण दिले जाते व जिला विभागीय मंडळाकडून मान्यता मिळाली आहे अशी परिसंस्था ;]

(क्यू) "शिक्षक" म्हणजे, विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या [7][माध्यमिक शाळेचा किंवा कनिष्ठ महाविद्यालयाचा (मुख्याध्यापक किंवा मुख्याध्यापिका किंवा प्राचार्य] यांच्या व्यतिरिक्त) शिक्षक वर्गातील व्यक्ती ;

[8][ (र) "पाठ्यपुस्तक" याचा [9][माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाची] अंतिम इयत्ता धरुन कोणत्याही इयत्तेच्या संबंधातील अर्थ त्या इयत्तेसाठी राज्य मंडळाने विहित केलेले किंवा तयार केलेले किंवा त्याने तयार करण्याची आणि विहित करण्याची तजवीज केलेले कोणतेही पुस्तक असा आहे; ]

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ५ (फ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५ (फ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ (ब) अन्वये खंड (न) वगळण्यात आला.

[4] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ५ (ह) अन्वये "भारतात कायद्याअन्वये स्थापन केलेल्या विद्यापीठाकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ५ (आय) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ज) अन्वये खंड (प-१) समाविष्ट करण्यात आला.

[7] वरील अधि नियमाच्या कलम ५ (के) अन्वये 'माध्यमिक शाळेची मुख्याध्यापिका' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (र) दाखल करण्यात आला.

[9] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ५ (ल) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**राज्य आणि विभागीय मंडळांची स्थापना.** *३. (१) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्याकरिता "महाराष्ट्र राज्य माध्यमिक [1][व उच्च माध्यमिक] शिक्षण मंडळ" या नावाचे एक मंडळ स्थापन करील.

(२) राज्य शासन, तशाच प्रकारे, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, [2][ * * ] विभागांपैकी प्रत्येक विभागासाठी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाचे एक मंडळ स्थापन करील.

**पहिल्या अनुसूचीत सुधारणा करण्याचा शासनाचा अधिकार.** [3][३-अ. राज्य शासनाला या अधिनियमाखाली वेळोवेळी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाचा, अशा क्षेत्रासाठी आणि अशा तारखेपासून, कोणताही नवीन विभाग स्थापन करता येईल आणि पहिल्या अनुसूचीमध्ये आवश्यक त्या नोंदी समाविष्ट करता येतील; आणि त्या प्रयोजनासाठी किंवा त्याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी राज्य उक्त अधिसूचनेद्वारे, त्या अनुसूचीमध्ये तदनुरूप सुधारणा करून, कोणत्याही विद्यमान किंवा नवीन विभागाचे क्षेत्र कमी करता येईल, वाढविता येईल किंवा त्यात फेरफार करता येतील आणि लागोलाग अनुसूचीतील नोंदी तदनुसार सुधारित झालेल्या असतील].

**राज्य मंडळ कायद्याने संस्थापित करणे.** ४. राज्य मंडळ हे वर नमूद केलेल्या नावाचा एक निगम निकाय असेल आणि त्याची अखंड अधिकार-परंपरा असेल व त्याची एक सामान्य मुद्रा असेल आणि त्यास मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उक्त नावाने त्यास व त्याच्यावर दावा लावता येईल.

**राज्य मंडळाची रचना.** ५. (१) राज्य मंडळ हे, राज्य शासनाने नेमलेला एक सभापती, आणि पुढील सदस्य यांचे मिळून बनलेले असेल :—

**वर्ग अ—पदसिद्ध सदस्य**

(एक) शिक्षण संचालक किंवा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला शिक्षण विभागाचा कोणताही इतर अधिकारी;

[4][(एक-अ) उच्च शिक्षण संचालक किंवा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला शिक्षण विभागाचा अन्य कोणताही अधिकारी];

---

*१९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याचे कलम ६ (२) पुढील प्रमाणे आहे :—

"(२) या अधिनियमाच्या कलम २२ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणांस बाध न येऊ देता, कोणत्याही कायद्यातील किंवा कोणत्याही विलेखातील किंवा इतर दस्तऐवजातील "महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ" शब्दप्रयोगाच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, भिन्न हेतू दिसत नसेल तर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ याचा निर्देश असल्यासारखा लावण्यात येईल, आणि महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या प्रारंभाच्या वेळी, ज्यामध्ये किंवा ज्या बाबतीत महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ एक पक्ष असेल अशा, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण यांच्यापुढे अनिर्णीत असलेल्या सर्व दाव्यात किंवा न्यायालयीन कार्यवाहीमध्ये त्याऐवजी "महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा पक्ष असल्याचे मानण्यात येईल."

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ६ (१) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ अन्वये 'तीन' हा शब्द वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये कलम ३-अ समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७ (१) (अ) (एक) अन्वये परिच्छेद, (एक-अ) समाविष्ट करण्यात आला.

(दोन) विभागीय मंडळांचे [1][सभापती];

(तीन) तंत्र शिक्षण संचालक किंवा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला तंत्र शिक्षण विभागाचा कोणताही इतर अधिकारी;

(चार) कृषि संचालक किंवा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला कृषि विभागाचा कोणताही इतर अधिकारी;

[2][(चार-अ) कला संचालक किंवा राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला कला संचालनालयाचा कोणताही इतर अधिकारी;]

[3][(पाच) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद;]

[4]* * * * * *

**वर्ग ब—निवडून दिलेले सदस्य**

(एक) राज्यात कायद्याने स्थापन केलेल्या प्रत्येक विद्यापीठामधून एक सदस्य, असा सदस्य, त्या विद्यापीठाच्या विद्या परिषदेने किंवा इतर पदनिर्देशित प्राधिकाऱ्याने निवडून दिलेली व्यक्ती असेल.

[5]* * * * *

(दोन) महाराष्ट्र विधानसभेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेले दोन सदस्य.

(तीन) महाराष्ट्र विधानपरिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेला एक सदस्य.

**वर्ग क—नामनिर्देशित सदस्य**

(एक) विभागीय मंडळाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेले [6][प्राचार्य], मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका यांच्यामधून [7][राज्य शासनाने पदनिर्देशित केलेले सहा सदस्य] [6][यापैकी किमान एक जण कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राचार्य असेल].

[8]* * * * * * *

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ (१) (अ) (एक) अन्वये 'मंडळाचा सभापती' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ३ अन्वये हा परिच्छेद दाखल करण्यात आला.

[3] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ (१) (अ) (दोन) अन्वये मूळ परिच्छेदाऐवजी परिच्छेद (पाच) दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ७ (१) (अ) (तीन) अन्वये परिच्छेद (सहा) व (सात) वगळण्यात आले.

[5] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७ (१) (ब) अन्वये "विभागीय मंडळाचा सदस्य" या शब्दांनी सुरू होणारा व "केलेली व्यक्ती (कोणतीही असल्यास)" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ७ (१) (क) (एक) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[7] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ (१) (ब) (एक) अन्वये 'प्रत्येक महसूल विभागातून दोन याप्रमाणे राज्य शासनाने पदनिर्देशित केलेले चार सदस्य' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७ (१) (क) (दोन) अन्वये परिच्छेद (एक-अ) वगळण्यात आला.

(दोन) विभागीय मंडळांचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेल्या शिक्षकांमधून [1][राज्य शासनाने पदनिर्देशित केलेले सहा सदस्य] [2][यापैकी किमान दोन सदस्य कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक असतील].

(तीन) राज्यातील [3][शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या] प्राचार्यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य.

[4]* * * * * *

(चार) विभागीय मंडळांचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेल्या माध्यमिक शाळांच्या [5][आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या] व्यवस्थापक मंडळांच्या प्रतिनिधींमधून [6][राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले सहा सदस्य] [5][यापैकी किमान एक सदस्य कनिष्ठ महाविद्यालयांच्या व्यवस्थापक मंडळाचा प्रतिनिधी असेल.]

[7][(पाच) प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाशी संबंधित बाबींमध्ये विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असल्याच्या कारणावरून नामनिर्देशित करण्यात आलेले [8][राज्य शासनाने पदनिर्देशित केलेले सहा सदस्य,] यापैकी किमान एक स्त्री असेल.

[9]* * * * * *

[10][परंतु, राज्य शासन, 'वर्ग क—नामनिर्देशित सदस्य' या शीर्षकाखालील (एक), (दोन), (चार) व (पाच) या परिच्छेदांपैकी प्रत्येक परिच्छेदाखाली प्रत्येक विभागामधून किमान एकतरी सदस्य पदनिर्देशित करील].

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ (१) (ब) (दोन) अन्वये 'प्रत्येक महसूल विभागातून दोन याप्रमाणे राज्य शासनाने पदनिर्देशित केलेले आठ सदस्य' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ७ (१) (एक) (तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७ (१) (क) (चार) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ७ (१) (क) (पाच) अन्वये परिच्छेद (तीन-अ) वगळण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ७ (१) (क) (सहा) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ (१) (ब) (तीन) अन्वये 'प्रत्येक महसूल विभागातून एक याप्रमाणे राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेले चार सदस्य' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७ (१) (क) (सात) अन्वये मूळ परिच्छेदाऐवजी परिच्छेद (पाच) दाखल करण्यात आला.

[8] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ (१) (ब) (चार) अन्वये 'प्रत्येक महसूल विभागातून एक याप्रमाणे राज्य शासनाकडून पदनिर्देशित करण्यात आलेले चार सदस्य' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[9] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७ (१) (क) (आठ) अन्वये परिच्छेद (सहा) व (सात) वगळण्यात आले.

[10] वरील अधिनियमाचे कलम ७ (१) (क) (नऊ) अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[1][ परंतु, आणखी असे की,] कोणतीही व्यक्ती, ज्या विद्या परिषदेच्या किंवा विद्यापीठ प्राधिकरणाच्या सदस्यांनी तिला निवडून दिले त्यामध्ये असण्याचे बंद होईल तर किंवा विधानसभा सदस्य अथवा विधानपरिषद सदस्य असण्याचे बंद होईल तर किंवा ती प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका किंवा शिक्षक किंवा व्यवस्थापक मंडळाची प्रतिनिधी अशा व्यक्तींमधून नामनिर्देशित किंवा पदनिर्देशित करण्यात आली असेल त्याबाबतीत ती तशी व्यक्ती असण्याचे बंद होईल तर, ती राज्य मंडळाची सदस्य म्हणून अधिकारपद धारण करण्याचे बंद होईल आणि अशी कोणतीही व्यक्ती तेव्हापासून एका आठवड्याच्या आत, सभापतीस, ती मंडळाचा सदस्य असण्याचे याप्रमाणे बंद झाले असल्याचे स्वत:च्या सहीने लेखी कळवील.

(२) राज्य मंडळाचे सदस्य म्हणून वेळोवेळी निवडून आलेल्या किंवा नामनिर्देशित किंवा पदनिर्देशित करण्यात आलेल्या (पदसिद्ध सदस्य नसलेल्या) सदस्यांची नावे त्या मंडळाकडून शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

१९८६ चा महाराष्ट्र ११. [2][ (३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९८६ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अधिकारपद धारण करणारे राज्य मंडळाचे सर्व वर्ग क—नामनिर्देशित सदस्य हे, उक्त अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या पोट-कलम (१) खाली राज्य शासन ज्या तारखेस नवीन सदस्य नामनिर्देशित करील त्या तारखेस असे सदस्य असण्याचे बंद होतील व ते आपली अधिकारपदे रिकामी करतील].

६. (१) विभागीय मंडळात, राज्य शासनाने नेमलेला एक सभापती आणि पुढील सदस्य यांचा समावेश असेल,— विभागीय मंडळाची रचना.

वर्ग एक—पदसिद्ध सदस्य

(एक) विभागातील सर्व प्रादेशिक शिक्षण उप-संचालक,

(दोन) परिषद शिक्षण अधिकारी म्हणून विभागामध्ये सेवा करीत असलेले जिल्हा परिषदांचे अधिकारी [3][आणि शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई] यांच्यामधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले दोन शिक्षण अधिकारी.

[4]* * * * * *

वर्ग तीन—नामनिर्देशित सदस्य

[5][(एक) विभागातील प्राचार्य, मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका यांच्यामधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले सहा सदस्य, यांपैकी दोन सदस्य कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य असतील].

[6]* * * * * *

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ (१) (क) अन्वये "परंतु" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५ (२) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (३) हे दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ६ (१) (अ) अन्वये 'शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई आणि कन्या शाळा निरीक्षिका' या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ८ (१) (अ) अन्वये शीर्षक व त्याखालील परिच्छेद, वगळण्यात आला.

[5] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ (१) (ब) (एक) अन्वये परिच्छेद (एक) बदली दाखल करण्यात आला.

[6] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ८ (१) (ब) (दोन) अन्वये परिच्छेद (एक-अ) वगळण्यात आला.

[१][ (दोन) विभागातील शिक्षकांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले आठ सदस्य, त्यांच्यापैकी चार कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक असतील.]

[२]* * * * * *

[३][ (तीन) विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या माध्यमिक शाळांच्या आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या व्यवस्थापन मंडळांच्या प्रतिनिधींमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले दोन सदस्य, यापैकी एक कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळांचा प्रतिनिधी असेल.]

[४]* * * * * *

[५][परंतु एखादी व्यक्ती, जिला जेथील प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका किंवा शिक्षक किंवा व्यवस्थापक मंडळाचे प्रतिनिधी यांच्यामधून अशी व्यक्ती म्हणून नामनिर्देशित करण्यात आले असेल तेथे त्याप्रमाणे असण्याचे बंद होईल तर, ती व्यक्ती विभागीय मंडळाची सदस्य म्हणून अधिकारपद धारण करण्याचे बंद होईल आणि अशी व्यक्ती त्या वेळेपासून एका आठवड्यात, सभापतीस ती मंडळाचा सदस्य असण्याचे याप्रमाणे बंद झाले असल्याचे स्वतःच्या सहीने लेखी कळवील.]

(२) विभागीय मंडळाचे सदस्य म्हणून वेळोवेळी [६]* * * * नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्यांची (पदसिद्ध सदस्य नसलेल्या) नावे राज्य मंडळ शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करील.

[७][ (३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९८६ याच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वी अधिकारपद धारण करणारे प्रत्येक विभागीय मंडळाचे सर्व नामनिर्देशित सदस्य, उक्त अधिनियमान्वये सुधारण्यात आले असेल अशा पोट-कलम (१) खाली राज्य शासनाने ज्या तारखेला नवीन सदस्य नामनिर्देशित केले असतील त्या तारखेपासून असे सदस्य असण्याचे बंद होईल आणि ते आपली अधिकारपदे रिकामी करतील].

**मंडळांच्या सभापतींचा पदावधी व सेवेच्या शर्ती.** ७. (१) राज्य मंडळाचा सभापती आणि विभागीय मंडळाचा सभापती हे, त्यांच्या नेमणुकीच्या तारखेपासून चार वर्षांच्या अवधीकरिता अधिकारपद धारण करतील.

---

[१]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ (१) (ब) (दोन) अन्वये मूळ परिच्छेदाऐवजी परिच्छेद (दोन) दाखल करण्यात आला.

[२]सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ८ (१) (ब) (चार) अन्वये परिच्छेद (तीन) व (तीन-अ) वगळण्यात आले.

[३]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ (१) (ब) (तीन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ८ (१) (ब) (सहा) अन्वये परिच्छेद (पाच) व (सहा) वगळण्यात आले.

[५]वरील अधिनियमाच्या कलम ८ (१) (क) अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[६]वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) अन्वये "निवडून देण्यात किंवा" हे शब्द वगळण्यात आले.

[७]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी पोट-कलम (३) दाखल करण्यात आले.

[1][(१-अ) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, लोकसेवेच्या निकडीच्या प्रसंगी कोणत्याही सभापतीची अशा पदावधीत शासनाच्या अधीन असलेल्या इतर कोणत्याही अधिकार-पदावर बदली करण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारास बाध येणार नाही; आणि जर कोणताही सभापती शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाला असेल तर, त्याची सेवा वाढविण्यात आली असेल किंवा त्याची शासनाच्या सेवेत फेरनेमणूक करण्यात आली असेल आणि त्याची इतर कोणत्याही अधिकार पदावर बदली करण्यात आली नसेल तर ते सेरीजकडून एरव्ही तो सभापती असण्याचे बंद होईल.]

(२) राज्य शासनाला, सभापतीच्या अधिकारपदाचा अवधी वेळोवेळी वाढवता येईल, परंतु असा अवधी एकूण आठ वर्षांहून अधिक असणार नाही.

(३) राज्य मंडळाचा सभापती आणि [2][विभागीय मंडळांचे सभापती] हे राज्य शासनाचे कर्मचारी असतील आणि त्यांना आपले वेतन व भत्ते राज्याच्या एकत्रित निधीमधून मिळतील. सभापतीचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती या राज्य शासन निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

(४) सभापतीचे अधिकारपद रजेमुळे, आजारीपणामुळे किंवा इतर कारणामुळे तात्पुरते रिकामे झाले असेल त्याबाबतीत राज्य शासनाला दुसऱ्या व्यक्तीची सभापती म्हणून नेमणूक करता येईल, अशा सभापतीचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती राज्य शासन निर्धारित करील अशा असतील.

**मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते.**

८. (१) राज्य मंडळाचे व विभागीय मंडळांपैकी प्रत्येक मंडळाचे पदसिद्ध सदस्य नसलेले सदस्य हे, ज्या तारखेस त्यांची नावे शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील त्या तारखेपासून चार वर्षांच्या अवधीपर्यंत पद धारण करतील :

परंतु मावळत्या सदस्यांचा पदावधी हा, त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांची नावे ज्या तारखेस शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली असतील त्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तारखेपर्यंत चालू राहील व त्या तारखेस संपेल.

(२) सदस्यांना, [3][विनियमांद्वारे] निर्धारित करण्यात येईल असा भरपाई भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

**सभापती व सदस्य यांची निरर्हता.**

९. पुढील बाबतीत कोणतीही व्यक्ती ही, राज्य मंडळाचा आणि विभागीय मंडळाचा किंवा या अधिनियमाखाली नेमण्यात आलेल्या कोणत्याही समितीचा सभापती किंवा सदस्य म्हणून नेमली जाण्यास, निवडून येण्यास, नामनिर्देशित किंवा पदनिर्देशित केली जाण्यास किंवा असा सभापती किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास निरर्ह ठरेल —

(अ) तिचा स्वतःचा किंवा तिच्या भागीदारामार्फत प्रत्यक्षरीत्या किंवा अप्रत्यक्षरीत्या —

(एक) प्रकाशित झालेल्या कोणत्याही पाठ्यपुस्तकात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल किंवा होता, किंवा

(दोन) राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत तिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल :

परंतु, उपखंड (एक) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही पाठ्यपुस्तकात जिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा व्यक्तीस, अशा पाठ्यपुस्तकाच्या प्रकाशनाच्या तारखेपासून पाच वर्षांचा अवधी लोटलेला असेल तर, उक्त उप-खंडाखाली ती व्यक्ती निरर्ह असल्याचे मानण्यात येणार नाही.

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ अन्वये पोट-कलम (१-अ) हे नेहमी-करिता दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ७ अन्वये 'विभागीय मंडळाचा सभापती' याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ९ अन्वये "राज्य मंडळाने केलेल्या उपविधी अन्वये" या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) ज्या व्यक्तीविरुद्ध कलम १५, पोट-कलम (१) [किंवा पोट-कलम (२)] खाली जिल्हा अधिकारपदावरून काढून टाकण्याचा आदेश देण्यात आला आहे अशी ती व्यक्ती असेल:

परंतु, ज्या व्यक्तीविरुद्ध असा आदेश देण्यात आला असेल ती व्यक्ती जिल्हा अधिकार पदावरून काढून टाकण्यात आल्याच्या तारखेपासून पाच वर्षांचा (किंवा राज्य शासन विनिर्दिष्ट करील असा त्याहून कमी कालावधी) लोटलेला असेल तर या खंडान्वये ती निरर्ह असल्याचे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—खंड (अ), उपखंड (एक) च्या प्रयोजनांकरिता —

(अ) पाठ्यपुस्तकाच्या प्रकाशनामध्ये त्याच्या पुनर्प्रकाशनाचा समावेश असेल;

(ब) एखाद्या व्यक्तीचा अशा पाठ्यपुस्तकाच्या प्रकाशनाच्या धंद्यात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर त्या कारणावरून ती निरर्ह आहे असे मानण्यात येईल.

निरर्हतेमुळे सभापतीची किंवा सदस्याची जागा रिकामी होणे.

१०. जर, राज्य मंडळाचा किंवा विभागीय मंडळाचा किंवा कोणत्याही समितीचा सभापती किंवा सदस्य हा, निकटपूर्ववर्ती कलमात नमूद केलेल्या निरर्हतांपैकी कोणत्याही निरर्हतेस अधीन झाला असेल तर, त्यानंतर त्याचे अधिकारपद रिकामे होईल.

परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याची जागा रिकामी होणे.

११. राज्य मंडळावर किंवा विभागीय मंडळावर निवडून आलेला किंवा नामनिर्देशित केलेला किंवा पदनिर्देशित केलेला एखादा सदस्य, मंडळाच्या परवानगीशिवाय मंडळाच्या लागोपाठ तीन बैठकींना अनुपस्थित राहील तर, त्यानंतर त्याचे अधिकारपद रिकामे होईल.

रिकाम्या जागेबाबतच्या प्रश्नाचा निर्णय.

१२. सभापतीचे किंवा सदस्यांचे अधिकारपद कलम १० किंवा ११ खाली रिकामे झाले आहे किंवा काय, याविषयी कोणताही प्रश्न उद्भवल्यास, तो प्रश्न, राज्य शासनाच्या निर्णयासाठी पाठविण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

रिकामी जागा अधिसूचित करणे.

१३. राज्य मंडळ, कलम १० किंवा ११ खालील कोणतीही रिकामी जागा शासकीय राजपत्रात अधिसूचित करील.

सदस्याचा राजीनामा.

१४. राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या, पदसिद्ध सदस्य नसलेल्या सदस्यास मंडळाच्या सभापतीकडे लेखी राजीनामा देऊन कोणत्याही वेळी आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल; आणि असा राजीनामा सभापतीस मिळाल्याबरोबर, अशा सदस्याने आपले अधिकारपद रिकामे केले आहे असे मानण्यात येईल.

सदस्यास काढून टाकणे.

[1][२][१५. (१) राज्य शासनास, यथास्थिति, राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या शिफारशीवरून आणि त्यास जी चौकशी करणे योग्य वाटेल अशी जाणखी कोणतीही चौकशी, करावयाची असल्यास ती केल्यानंतर आदेशाद्वारे, राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही परिषदेच्या किंवा समितीच्या कोणत्याही सदस्यास, जर असा सदस्य—

---

[१]सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२]वरील अधिनियमाचे कलम ११ अन्वये मूळ कलम १५ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(अ) नैतिक अध:पतन अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयांकडून सिद्धापराध ठरविलेला असेल; किंवा

(ब) अमुक्त नादार असेल; किंवा

(क) राज्य शासन विनिर्देशित करील अशा वैद्यकीय प्राधिकरणाने त्याला शारीरिकदृष्ट्या नि:समर्थ म्हणून घोषित केले असेल; किंवा

(ड) विकल मनाचा असून सक्षम न्यायालयाने त्याप्रमाणे घोषित केले असेल; किंवा

(ई) राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या ध्येयांना व उद्दिष्टांना हानिकारक अशा रीतीने वागत असेल ;

तर त्यास काढून टाकता येईल :

परंतु, असे की, अशी शिफारस किंवा असा आदेश ज्याच्याशी संबंधित असेल अशा सदस्याला, ती शिफारस किंवा तो आदेश कां काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आली असल्याखेरीज, राज्य मंडळ किंवा विभागीय मंडळ अशी कोणतीही शिफारस करणार नाही किंवा खंड (ई) खालील कोणताही आदेश काढणार नाही.

(२) राज्य शासनाला, त्याच्या मते राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही परिषदेच्या किंवा समितीच्या निवडून दिलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या किंवा पदनिर्देशित केलेल्या ज्या कोणत्याही सदस्याच्या हालचाली राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही परिषदेच्या किंवा समितीच्या सुरळीत कामकाजास हानिकारक असतील किंवा अडथळा करत असतील, त्या सदस्यास, आदेश काढून स्वत: होऊन दूर करता येईल :

परंतु कोणत्याही सदस्याला त्याच्याविरुद्ध असा आदेश कां काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज अधिकारपदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(३) राज्य मंडळ, पोट-कलम (१) किंवा (२) खाली अधिकारपदावरून काढून टाकलेल्या कोणत्याही सदस्याचे नाव शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करील.

१६. (१) राज्य मंडळाची व प्रत्येक विभागीय मंडळाची वर्षातून निदान दोन वेळा तरी सभा होतील आणि लागोपाठच्या दोन सभांच्या दरम्यान सहा महिन्यांचे अंतर पडणार नाही. मंडळाच्या सभा.

(२) राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या सभापतीस, कोणत्याही वेळी आणि मंडळाच्या एकूण सदस्यांपैकी (पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त) एक-तृतीयांशाहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केली असता, सभापती, त्यास अशी विनंती मिळाल्याच्या तारखेपासून एकवीस दिवसांपेक्षा नंतरची नसेल अशा तारखेला मंडळाची विशेष सभा बोलाविता येईल.

१७. मंडळास, त्याच्यामते जी कोणतीही व्यक्ती शिक्षण क्षेत्रातील तज्ञ असेल अशा व्यक्तीला [१][किंवा] राज्य शासनाच्या [१][कोणत्याही अधिकाऱ्यास], * * * ती तज्ञ व्यक्ती किंवा तो अधिकारी ज्या विषयाशी संबंधित असेल तो विषय जर मंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या सभेमध्ये चर्चेसाठी किंवा विचारार्थ मांडला जाण्याचा संभव असेल किंवा मांडण्यात आला असेल तर त्या सभेस त्या व्यक्तीला किंवा त्या अधिकाऱ्याला निमंत्रित करता येईल. तज्ञांना आणि अधिकाऱ्यांना सभेस बोलाविण्याचा अधिकार.

१८. या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, राज्य मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :— राज्य मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

(अ) राज्य शासनाला सर्वसाधारणपणे [३][माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक] शिक्षणाशी संबंधित असलेल्या धोरणविषयक बाबींवर आणि विशेषकरून पुढील बाबींवर सल्ला देणे :—

(एक) [३][माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक] शिक्षणाची एकरूप आकृतिबंध राखणे;

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम (अ) अन्वये "किंवा खालीलपैकी कोणताही अधिकारी किंवा इतर कोणताही अधिकारी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) अन्वये "(एक) कला शिक्षण संचालक" या शब्दांनी सुरू होणारा व "(आठ) राष्ट्रीय छात्र सेना संचालक" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १३ (१) (अ) (एक) अन्वये "माध्यमिक शिक्षण" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(दोन) माध्यमिक शाळांमध्ये [१][आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये] शिक्षणाचा समान दर्जा राखणे;

(तीन) [२][माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक] शिक्षणात राष्ट्रीय धोरणे व राज्याची धोरणे यांमध्ये समन्वय ठेवणे;

(चार) [२][माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक] शिक्षण, विद्यापीठातील शिक्षण आणि प्राथमिक [३]* * * * यांमध्ये समन्वय ठेवणे;

[४][(ब) अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निर्धारित करण्यासाठी आणि उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सर्व इयत्तांसाठी तपशीलवार पाठ्यक्रम तयार करणे;]

[५](क) * * * * * * *

(ड) शिक्षक वर्ग, इमारती, फर्निचर, साधने, लेखनसामग्री आणि [१][माध्यमिक शाळांना आणि कनिष्ठ महाविद्यालयांना] लागणाऱ्या इतर गोष्टी यांच्या संबंधात प्रमाणभूत गरजा विहित करणे;

[७][(ई) [६][माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची] अंतिम इयत्ता धरून सर्व इयत्तांसाठी कोणतीही पुस्तके पाठ्पुस्तके म्हणून विहित करणे किंवा तयार करणे किंवा तयार करण्याची तजवीज करून ती पाठ्यपुस्तके म्हणून विहित करणे;]

[९][(फ) अंतिम परीक्षेसाठी नियमित आणि खाजगी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंबंधीच्या सर्वसाधारण शर्ती विहित करणे, आणि उपस्थिती आणि वर्तणूक यासंबंधीच्या ज्या शर्ती पुर्ण करण्यात आल्यावर विद्यार्थ्याला अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळेल आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क प्राप्त होईल त्या शर्ती विनिर्दिष्ट करणे;]

(ग) अंतिम परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देणे;

(ह) शिष्यवृत्त्या, विद्यावेतने, पदके, बक्षीसे, आणि इतर पारितोषिके सुरु करणे व देणे आणि त्यासाठी शर्ती विहित करणे;

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १३ (१) (अ) (दोन) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३ (१) (अ) (एक) अन्वये "माध्यमिक शिक्षण" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३ (१) (अ) (तीन) अन्वये "व मूलोद्योग" हे शब्द वगळण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १३ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी खंड (ब) दाखल करण्यात आला.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ५ (अ) अन्वये खंड (क) वगळण्यात आला.

[६] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १३ (३) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ५ (ब) अन्वये खंड (ई) बदली दाखल करण्यात आला.

[८] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १३ (४) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ५ (क) अन्वये खंड (फ) बदली दाखल करण्यात आला.

(आय) मृत्युपत्रित दाने, देणग्या, दाननिधी, विश्वस्तव्यवस्था आणि कोणत्याही मालमत्तेची किंवा तिच्यातील हितसंबंधाची अथवा तिच्यातील हक्काची इतर हस्तांतरणे स्वीकारणे;

(ज) वरील खंड (आय) मध्ये उल्लेखिलेली कोणतीही मालमत्ता, हितसंबंध किंवा हक्क धारण करणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे व त्यांचा व्यवहार करणे;

(के) विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या माध्यमिक शाळांकडे [1][आणि कनिष्ठ महाविद्यालयांकडे] विहित फीची मागणी करणे व ती स्वीकारणे;

(ल) माध्यमिक शाळांना [2][आणि उच्च माध्यमिक] शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा कायम राखला जात असल्याबद्दलची निश्चिती करून घेण्यासाठी शिक्षण संचालक किंवा शिक्षण विभागाचे इतर अधिकारी यांच्याकडून विशेष अहवाल व माहिती मागविणे आणि विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या कोणत्याही माध्यमिक शाळेकडून [2][किंवा कनिष्ठ महाविद्यालयाकडून] कोणतीही माहिती मागविणे;

(म) विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या परिसरस्थातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, नैतिक व सामाजिक कल्याणाच्या प्रवर्धनासाठी उपाययोजनांची शिफारस करणे आणि त्यांच्या निवासस्थानाबाबतच्या व शिस्तीबाबतच्या शर्ती विहित करणे;

(न) राज्य मंडळाच्या आणि विभागीय मंडळाच्या कार्यालयात (सभापती, सचिव, सह-सचिव किंवा सहायक सचिव वगळून) अधिकारी व कर्मचारी नेमणे आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती यांचे विनियमन करणे;

(ओ) राज्य मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या लाभार्थ भविष्यनिर्वाह निधी स्थापन करणे;

[3][(प) राज्य मंडळाची व विभागीय मंडळांनी संबंधित वार्षिक वित्तीय विवरणे मान्य करणे व राज्य शासनाला वार्षिक अर्थसंकल्पाची मंजुरीसाठी शिफारस करणे;]

(क्यू) विभागीय मंडळांच्या कामकाजाचे सर्वसाधारण निरीक्षण करणे व त्यावर देखरेख ठेवणे आणि त्या त्यांच्या लेख्यांचे नियतकालिक निरीक्षण करणे;

(र) अभ्यासक्रमाचे व शिक्षण देण्याच्या व परीक्षेच्या पद्धतीचे मूल्यमापन करण्याच्या व तीत सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी सांख्यिकीय व अन्य संशोधन करणे;

[4][(र-१) खुला शालेय पाठ्यक्रम धरून वेगवेगळ्या माध्यमांद्वारे, अंतिम परीक्षा घेतली जाणारे टपाली पाठ्यक्रम व इतर अनौपचारिक पाठ्यक्रम चालविणे;]

(स) या अधिनियमाखालील आपली कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा समित्यांची नेमणूक करणे;

(ट) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी विनियम करणे;

(थ) राज्य मंडळ आणि विभागीय मंडळे व त्यांच्या समित्या यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती [5]* * * * * आणि या अधिनियमान्वये आणि त्याखालील विनियमान्वये जिची तरतूद करण्यात आली नसेल अशी केवळ राज्य मंडळे, विभागीय मंडळे व त्यांच्या समित्या यांच्याशी संबंधातील कोणतीही इतर बाब, यांच्याशी संबंधित उपविधी तयार करणे;

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १३ (५) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १३ (६) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १३ (७) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (प) हा दाखल करण्यात आला.

[4] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ कलम ८ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १३ (८) अन्वये "मंडळाच्या व समित्यांच्या सदस्यांनी द्यावयाचा भरपाई भत्ता" हे शब्द वगळण्यात आले.

(व्ही) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली त्यास प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे किंवा सोपवण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे;

(डब्ल्यू) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व कृती व गोष्टी करणे.

विभागीय मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

१९. या अधिनियमांच्या तरतुदींच्या अधीनतेने विभागीय मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) माध्यमिक शाळांमधील [1][आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील] प्रमाणभूत गरजांच्या बाबतीत राज्य मंडळाने केलेल्या शिफारशी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी विभागीय महत्वाच्या बाबींच्या संबंधात, एकतर त्या त्याच्याकडे निर्देशित करण्यात आल्यावरून किंवा स्वतः होऊन राज्य मंडळाला सल्ला देणे;

[2]* * * * *

[3]* * * * *

(ड) अंतिम परीक्षेस प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांसाठी विहित करण्यात येईल अशा फीची मागणी करणे व ती घेणे;

[4]* * * * *

(फ) आपल्या अधिकारितेच्या क्षेत्रात राज्य मंडळाच्या वतीने अंतिम परीक्षांचे काम चालवणे;

(ग) [5][राज्य मंडळ वेळोवेळी काढील अशा अनुदेशांनुसार] आपल्या अधिकारितेच्या क्षेत्रात अंतिम परीक्षांचे काम चालवण्यासाठी उमेदवारांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी आणि निकाल तयार करण्यासाठी आणि प्रसिद्ध करण्यासाठी प्राश्निक, अनुवादक, परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक आणि आवश्यक असेल असा इतर कर्मचारीवर्ग नेमणे;

(ह) राज्य मंडळाने याबाबतीत केलेल्या विनियमांस अनुसरून अंतिम परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे;

(आय) त्याच्याकडून चालवण्यात येणाऱ्या अंतिम परीक्षेसाठी त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रात केंद्रे उघडणे;

(ज) त्याने चालवलेल्या अंतिम परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांचे निकाल [6][राज्य मंडळाच्या परीक्षा समितीकडून निश्चित करण्यात येईल अशा तारखेस किंवा तारखांना] जाहीर करणे;

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १४ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ब) अन्वये खंड (ब) वगळण्यात आला.

[3] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३९, कलम ६ अन्वये खंड (क) वगळण्यात आला.

[4] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १४ (ब) अन्वये खंड (इ) वगळण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १४ (क) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ड) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(के) शिष्यवृत्त्या, विद्यावेतने, पदके, पारितोषिके व इतर बक्षिसे देण्याच्या प्रयोजनांसाठी राज्य मंडळाकडे गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांची एक यादी अग्रेषित करणे;

(ल) ज्यात अनुचित मार्गाचा वापर करण्यात आला असेल अशा प्रकरणांच्या बाबतीत, राज्य मंडळाने घालून दिलेल्या कार्यपद्धतीस अनुसरून कारवाई करणे;

(म) अंतिम परीक्षा धरून माध्यमिक शाळांतील [1][आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील] सर्व परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे सर्वसाधारणपणे मूल्यांकन करणे व त्याबाबतीत राज्य मंडळाकडे आवश्यक त्या शिफारशी करणे;

(न) विहित केलेल्या रीतीने माध्यमिक शाळांना [2][आणि कनिष्ठ महाविद्यालयांना] मान्यता देणे किंवा ती काढून घेणे;

(ओ) शैक्षणिक दर्जा कायम राखण्यासाठी, त्याने मान्यता दिलेल्या कोणत्याही माध्यमिक शाळे-कडून [3][आणि कनिष्ठ महाविद्यालयांकडून] कोणतीही माहिती मागविणे आणि राज्य मंडळाने दिलेल्या आदेशावरून किंवा स्वतः होऊन संबंधित विभागीय शिक्षण उप-संचालकांकडून विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या ज्या माध्यमिक शाळा [3][आणि जी कनिष्ठ महाविद्यालये] आवश्यक तो शैक्षणिक दर्जा कायम ठेवीत नसतील अशा माध्यमिक शाळांबाबत [4][आणि कनिष्ठ महाविद्यालयां-बाबत] विशेष अहवाल व माहिती मागविणे, आपण दिलेली मान्यता काढून घेणे, त्याचप्रमाणे असमाधान-कारक शैक्षणिक निकाल व गंभीर स्वरूपाच्या शैक्षणिक नियमबाह्यतांच्या बाबतीत, माध्यमिक शाळा संहितेअन्वये [5][किंवा राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या इतर कोणत्याही प्रशासकीय आदेशान्वये] देण्यात आलेली मान्यता काढून घेण्याची, यथास्थिति शिक्षण संचालनालयाकडे किंवा तंत्र शिक्षण संचालनालयाकडे शिफारस करणे;

(प) आपल्या समित्यांच्या शिफारशी आपल्या अभिप्रायांसह राज्य मंडळाकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करणे;

(क्यू) त्याने मान्यता दिलेल्या परिसंस्थांना व शिक्षण विभागाला अंतिम परीक्षांचे काम चालवण्या-बाबत सहकार्य देण्यास भाग पाडणे; [6][आणि जी परिसंस्था अंतिम परीक्षेचे काम चालवण्यासाठी आवश्यक त्या सोयी त्याला पुरवण्यात कसूर करील अशा परिसंस्थेकडून, असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची तिला वाजवी संधी दिल्यानंतर, मंडळाचे विशेषाधिकार काढून घेणे;]

[7][(क्यू-१) कलम १८ च्या खंड (र-१) खाली राज्य मंडळ विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे अंतिम परीक्षा घेतली जाणारे टपाली पाठ्यक्रम आणि इतर अनौपचारिक पाठ्यक्रम चालवणे;]

(र) राज्य मंडळ त्याच्याकडे प्रत्यायोजित करील अशा इतर अधिकारांचा वापर करणे.

२०. (१) या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली करण्यात आलेले विनियमन व उपविधी यांचे निष्ठापूर्वक पालन केले जाण्याची निश्चिती करणे हे राज्य मंडळाच्या व प्रत्येक विभागीय मंडळाच्या सभापतीचे कर्तव्य असेल व त्यास त्या प्रयोजनासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. **मंडळांच्या सभापतींचे अधिकार व कर्तव्ये.**

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १४ (ई) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १४ (फ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, याच्या अनुक्रमे कलम १४ (ग) (एक) व (दोन) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ग) (दोन) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ग) (तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ह) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ९ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(२) कोणत्याही निकडीच्या प्रसंगी तातडतोब कारवाई करण्यात आली पाहिजे असे राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या सभापतीचे मत असेल तर तो, त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करील आणि आपण केलेल्या कारवाईचे प्रतिवृत्त मंडळास त्याच्या लगतनंतरच्या सभेत सादर करील.

(३) प्रत्येक सभापती विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

सचिव, सह-सचिव व सहायक सचिव यांची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये.

२१. (१) राज्य मंडळाचा व प्रत्येक विभागीय मंडळाचा एक सचिव असेल व त्याची नेमणूक राज्य शासन करील.

(२) प्रत्येक सचिव हा, सभापतींच्या नियंत्रणाच्या आधीनतेने मंडळाचा कार्यकारी अधिकारी असेल आणि मंडळास अधीन राहून त्या त्या वेळी सेवा करीत असलेले सर्व इतर अधिकारी व कर्मचारी हे सचिवाच्या अधीन असतील.

(३) सचिवास, मंडळाच्या सभांना हजर राहण्याचा हक्क असेल, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

(४) प्रत्येक सचिव, विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(५) राज्य शासनास संबंधित राज्य मंडळाच्या किंवा एखाद्या विभागीय मंडळाच्या (कोणतेही असल्यास) शिफारशीवरून राज्य मंडळाकरिता किंवा त्या विभागीय मंडळाकरिता एक किंवा एकाहून अधिक सह-सचिव व सहायक सचिव नेमता येतील.

(६) सह-सचिव व सहायक सचिव, मंडळाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाखाली सचिव त्यास अनुक्रमे नेमून देईल अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

(७) या अधिनियमाखाली नेमण्यात आलेले सचिव, सह-सचिव व सहायक सचिव हे, राज्य शासनाचे कर्मचारी असतील आणि त्यांना त्यांची वेतने व भत्ते हे राज्याच्या एकत्रित निधीतून मिळतील. या अधिकाऱ्यांची वेतने व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती या राज्य शासन निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

मंडळांचे इतर अधिकारी व कर्मचारी.

२२. (१) राज्य मंडळास, त्याची व विभागीय मंडळांची या अधिनियमाखालील कार्ये सक्षम रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी नेमता येतील.

(२) पोट-कलम (१) खाली राज्य मंडळाने नेमलेल्या अधिकाऱ्यांची वेतने व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती या, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या विनियमांद्वारे राज्य मंडळ निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

समित्यांची नेमणूक.

२३. (१) राज्य मंडळ पुढीलप्रमाणे नामाभिधान केलेल्या समित्या नेमील :—

(अ) कार्यकारी परिषद.

(ब) विद्या परिषद.

(क) वित्त समिती.

(ड) परीक्षा समिती.

(इ) अभ्यास मंडळ किंवा मंडळे.

(२) राज्य मंडळास, आपली कार्ये सक्षम रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा इतर समित्या नेमता येतील.

(३) प्रत्येक विभागीय मंडळ पुढील नामाभिधान केलेल्या समित्यांची नेमणूक करील :—

(अ) स्थायी समिती.

[1] *　　*　　*　　*

[1] *　　*　　*　　*

(ड) परीक्षा समिती.

[1] *　　*　　*　　*

(४) विभागीय मंडळास, आपली कार्ये सक्षम रीतीने पार पाडण्यासाठी, विहित करण्यात येतील अशा इतर समित्या नेमता येतील.

(५) राज्य मंडळाने किंवा विभागीय मंडळाने नेमलेल्या प्रत्येक समितीची रचना, तिच्या सदस्यांचा पदावधी व तिने पार पाडावयाची कर्तव्ये व कार्ये ही, विहित करण्यात येतील अशी असतील.

२४. राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही समितीच्या सदस्यां-मधील नैमित्तिकरीत्या रिकाम्या झालेल्या सर्व जागा या, शक्य तितक्या लवकर, यथास्थिति निवडणुकीद्वारे किंवा नामनिर्देशनाद्वारे किंवा नेमणूक करून किंवा पदनिर्देशनाद्वारे भरण्यात येतील; आणि अशा नैमित्तिक-रीत्या रिकाम्या झालेल्या जागेवर निवडून आलेली, नामनिर्देशित केलेली किंवा नेमण्यात आलेली किंवा पदनिर्देशित केलेली व्यक्ती ही, ती ज्याच्या जागेवर निवडून आली असेल, नामनिर्देशित करण्यात किंवा नेमण्यात किंवा पदनिर्देशित करण्यात आली असेल त्या सदस्याने, ती जागा रिकामी झाली नसती तर जोवर तिने अधिकारपद धारण केले असते, तोवरच अधिकारपद धारण करील. नैमित्तिक-रीत्या रिकाम्या झालेल्या जागा.

२५. राज्य मंडळाचे किंवा विभागीय मंडळाचे किंवा मंडळाच्या कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कामकाज हे अशा मंडळामध्ये किंवा समितीत कोणतेही पद रिकामे होते किंवा अशा मंडळाच्या किंवा समितीच्या रचनेत दोष होता याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही. रिकाम्या जागांमुळे किंवा रचनेतील दोषांमुळे कृती किंवा कामकाज विधिअग्राह्य न होणे.

२६. (१) राज्य मंडळाचा स्वतःचा असा एक निधी असेल आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :— राज्यमंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा व त्याची गुंतवणूक.

(अ) मंडळाने बसविलेली फी, स्वामित्वधन व आकार (विहित करण्यात आलेल्या शास्ती धरून);

(ब) मंडळास राज्य शासनाने कोणतीही अनुदाने, अभिहस्तांकने, अंशदाने आणि कर्जे दिली असल्यास ती;

(क) कोणतीही मृत्युपत्रितदाने, देणग्या व दाननिधी किंवा इतर अंशदाने असल्यास ती;

(ड) मंडळामध्ये निहित असलेल्या कोणत्याही कर्जरोख्यांवरील व्याज आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न;

(इ) मंडळामध्ये निहित असलेल्या मालमत्तेपासून मिळणारे सर्व भाडे व नफे;

(फ) मंडळास किंवा त्याच्या वतीने मिळालेला सर्व पैसा.

१९३४ चा २. (२) उक्त निधी, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेत ठेवण्यात येईल किंवा राज्य मंडळाच्या स्वेच्छाधिकारानुसार भारतीय न्यास
१८८२ चा २. अधिनियम, १८८२ अन्वये अधिकृत करण्यात आलेल्या कर्जरोख्यांत गुंतविला येईल.

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १५ अन्वये खंड (ब), (क) आणि (ड) वगळण्यात आले.

सभापती, सचिव, सहसचिव आणि सहायक सचिव यांचे वेतन, निवृत्ति-वेतन वगैरेचा परिव्यय राज्य मंडळाने निधीतून देणे.

२७. मंडळाचे सभापती, सचिव, सहसचिव आणि सहायक सचिव यांचे वेतन, निवृत्तिवेतन रजा-भत्ते व इतर भत्ते यांसाठी, राज्य शासन निर्धारित करील अशी रक्कम राज्य मंडळ प्रतिवर्षी आपल्या निधीतून राज्य शासनास देईल.

निधीचे सर्वसाधारण उपयोजन

२८. या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने राज्य मंडळाच्या निधीचे उपयोजन, या अधिनियमात विनिर्देशित केलेल्या बाबींशी आनुषंगिक असलेले आकार व खर्च देण्यासाठी आणि या अधिनियमाखाली स्थापन करण्यात आलेल्या मंडळाला ज्या प्रयोजनासाठी या अधिनियमान्वये किंवा त्याखाली अधिकार प्रदान करण्यात आले असतील व त्यांच्याकडे कर्तव्ये सोपविण्यात आली असतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठीच केवळ करण्यात येईल.

निधीतून पैसा कसा काढावा.

२९. राज्य मंडळाच्या किंवा विभागीय मंडळाच्या अधीन सेवा करणाऱ्या व याबाबतीत राज्य मंडळाने रीतसर प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने सही केलेल्या धनादेशाद्वारे किंवा पतपत्राद्वारे असेल त्याखेरीज बँक राज्य मंडळाच्या निधीतून कोणतीही रक्कम देणार नाही.

विभागीय मंडळांना नियत वाटपप्राप्त रक्कम.

[१][३०. राज्य मंडळ, विभागीय मंडळाला, त्याच्यावर या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली लादण्यात आलेली कर्तव्ये व कामे पार पाडण्यास किंवा या अधिनियमाशी विसंगत नसतील अशी त्याच्या अधिकारितेतील कामे किंवा विकास परियोजना पूर्ण करण्यास समर्थ करण्यासाठी निर्धारित करील अशा रकमा राज्य मंडळ वेळोवेळी प्रत्येक विभागीय मंडळाला देईल.]

वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

३१. (१) राज्य मंडळ विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी, आणि अशा रीतीने उक्त मंडळाच्या पुढील वित्तीय वर्षाच्या प्राप्ती व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज, [२][त्यामध्ये विभागीय मंडळाची प्राप्ती व खर्च अंतर्भूत करून] तयार करील.

[३][(२) राज्य मंडळ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा त्यानंतर, आपण तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजांवर विचार करील व त्याने मान्य केल्याप्रमाणे ते राज्य शासनास त्याच्या मंजुरीसाठी सादर करील. राज्य शासनास, अर्थसंकल्पीय अंदाजांच्या संदर्भात, त्यास योग्य वाटतील असे आदेश काढता येतील व ते राज्य मंडळाला कळविता येतील. राज्य मंडळ असे आदेश अंमलात आणील.

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

३२. राज्य मंडळ, विभागीय मंडळाच्या लेख्यांचा समावेश करून जमा व खर्च यांचे वार्षिक लेखे तयार करील आणि लेखापरीक्षेसाठी ते राज्य शासनाकडे पाठवील. राज्य शासन लेखापरीक्षा करण्याची तजवीज करील आणि राज्य मंडळ, लेखापरीक्षेसाठी राज्य शासन निर्धारित करील असा आकार देईल.

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १६ अन्वये मूळ कलमाऐवजी *कलम ३० दाखल करण्यात आले.*

[२] *सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १७ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट* करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) अन्वये पोट-कलमे (२), (३) व (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

**निरीक्षण व चौकशी.**

[1][३२अ. (१) राज्य शासनास, राज्य मंडळ किंवा विभागीय मंडळ यांची, विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या कोणत्याही माध्यमिक शाळेच्या [2][किंवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या] इमारती, वसतिगृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि सामग्री यांचे, अशा कोणत्याही शाळेने [3][किंवा महाविद्यालयाने] चालविलेले अध्यापन आणि इतर काम यांचे आणि राज्य मंडळाच्या वतीने घेतलेल्या कोणत्याही परीक्षेच्या संचालनाचे राज्य शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून निरीक्षण करविण्याचा आणि कोणत्याही मंडळाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात तशाच रीतीने चौकशी करविण्याचा हक्क असेल. प्रत्येक प्रकरणी, राज्य शासन, निरीक्षण किंवा चौकशी करविण्याच्या आपल्या इराद्याची संबंधित मंडळाला रीतसर सूचना देईल, आणि त्या मंडळाला एक प्रतिनिधी नेमण्याचा हक्क असेल व अशा प्रतिनिधीस अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या वेळी हजर राहण्याचा आणि बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(२) राज्य शासन अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षांच्या संबंधात आपले विचार मंडळाला कळवील आणि मंडळाचे त्यावरील मत अजमाविल्यानंतर करावयाच्या कारवाईबद्दल त्याला सल्ला देऊ शकेल आणि अशी कारवाई करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करू शकेल.

(३) निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षांबाबत मंडळाने कोणतीही कारवाई केली असेल किंवा करावयाचे ठरविले असेल तर त्यासंबंधी ते राज्य शासनास प्रतिवृत्त देईल. असे प्रतिवृत्त, मंडळाच्या त्यावरील मतासह राज्य शासन निदेश देईल अशा वेळेच्या आत सादर करण्यात येईल.

(४) निश्चित केलेल्या वेळेच्या आत, मंडळाने राज्य शासनाचे समाधान होईल अशी कारवाई केली नसेल त्याबाबतीत, राज्य शासनास, मंडळाने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, आपणास योग्य वाटेल असे निदेश काढता येतील आणि मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.]

**मंडळांनी पुरवावयाची माहिती, विवरणपत्रे इत्यादी.**

३३. (१) राज्य मंडळ व प्रत्येक विभागीय मंडळ, राज्य शासन पुरवण्यास सांगेल अशी प्रतिवृत्ते, विवरणपत्रे आणि विवरणे आणि विभागीय मंडळाच्या कामाशी संबंध असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात राज्य शासन मागवील अशी आणखी माहिती राज्य शासनास पुरवील.

(२) असे कोणतेही प्रतिवृत्त, विवरणपत्रे किंवा विवरणे किंवा पुरविलेली माहिती विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनास, या अधिनियमाशी सुसंगत असणारे आवश्यक असतील असे निदेश देता येतील आणि यथास्थिति राज्य मंडळ किंवा विभागीय मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

**निदेश काढण्याचे राज्य शासनाचे अधिकार.**

३४. (१) राज्य शासनाला, राज्य मंडळाने कोणताही सल्ला दिलेला असल्यास तो सल्ला विचारात घेतल्यानंतर कलम १८ च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबीसंबंधात त्यास आवश्यक वाटतील असे निदेश त्या मंडळास किंवा विभागीय मंडळास देण्याचा अधिकार असेल. संबंधित मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

(२) तसेच राज्य मंडळास किंवा कोणत्याही विभागीय मंडळास त्याने चालविलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधात किंवा चालवीत असलेल्या किंवा करीत असलेल्या किंवा चालविण्याचा किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधात लिहिण्याचा आणि त्याबाबतीतील आपली मते संबंधित मंडळास कळविण्याचा अधिकार राज्य शासनाला असेल.

(३) संबंधित मंडळ, कळविण्यात आलेल्या बाबीसंबंधात कोणतीही कारवाई केली असल्यास किंवा करण्याचे योजिले असल्यास, तसे राज्य शासनाला कळवील आणि अशी कारवाई करण्यात जर त्याने कसूर केली असेल तर त्याबाबत स्पष्टीकरण देईल.

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३ अन्वये कलम ३२-अ. हे समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १८, (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १८ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(४) जर अशा मंडळाने राज्य शासनाचे समाधान होईल अशा रीतीने वाजवी अवधीत कारवाई केली नाही तर, राज्य शासनास मंडळाने दिलेले स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, अधिनियमाशी सुसंगत असणारे व त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील आणि मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

(५) निकडीच्या वेळी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, राज्य शासनास संबंधित मंडळाशी आगाऊ विचारविनिमय न करता या अधिनियमाशी सुसंगत असणारी त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करता येईल, आणि राज्य शासन, केलेल्या कारवाईबाबत मंडळास तावडतोब कळवील.

(६) कोणत्याही मंडळाचा कोणताही ठराव, आदेश किंवा कृती ही, अशा मंडळास या अधिनियमान्वये किंवा त्याखाली प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा अतिक्रम करून करण्यात आली आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, राज्य शासनास, लेखी आदेशाद्वारे कोणत्याही मंडळाचा कोणताही ठराव किंवा आदेश याची अंमलबजावणी निलंबित करता येईल आणि अशा मंडळाने जी कारवाई करण्याचा आदेश दिला असेल किंवा तसा आदेश दिला असल्याचे दिसून येत असेल अशी कारवाई करण्यास प्रतिबंध करता येईल. त्याबाबतची कारणे नमूद करावी लागतील.

(७) या कलमाखाली किंवा [1][निकटपूर्ववर्ती दोन कलमांपैकी कोणत्याही कलमाखाली] राज्य शासनाने विभागीय मंडळास कोणताही निदेश, आदेश दिला असेल अथवा इतर बाब कळविली असेल त्याबाबतीत किंवा विभागीय मंडळाने राज्य शासनाला कोणताही अहवाल, स्पष्टीकरण किंवा इतर विज्ञापन सादर केले असेल त्याबाबतीत, त्याची एक प्रत राज्य मंडळास पाठविण्यात येईल.

मंडळाकडे किंवा समितीकडे प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत.

३५. या अधिनियमाखाली राज्य मंडळाने वापर करण्यासाठी त्यास प्रदान करण्यात आलेले जे अधिकार त्या मंडळाने विनियमांद्वारे विभागीय मंडळाकडे किंवा समितीकडे प्रत्यायोजित केले असतील त्या अधिकारांचा वापर करण्यासंबंधीच्या सर्व बाबी त्या निकायाकडे सोपविल्या जातील आणि अशा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यापूर्वी, राज्य मंडळ, संबंधित बाबींसंबंधातील उक्त निकायांचे प्रतिवृत्त स्वीकारील व त्यावर विचार करील.

विनियम करण्याचा राज्य मंडळाचा अधिकार.

३६. (१) राज्य मंडळास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ विनियम करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा विनियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टीबाबत तरतूद करता येईल :—

(अ) कलम २३ खाली नेमण्यात आलेल्या समित्यांची रचना, अधिकार व कर्तव्ये;

(ब) अंतिम परीक्षांचे विषय व अभ्यासक्रम;

[2][(क) अंतिम परीक्षेसाठी, नियमित आणि खाजगी उमेदवारांना प्रवेश देण्याबाबतच्या सर्वसाधारण शर्ती आणि विद्यार्थ्याला ज्या शर्ती पूर्ण करण्यात आल्यावर अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळण्याचा आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क असेल अशा, उपस्थिती आणि चारित्र्य यासंबंधीच्या कोणत्याही विशेष शर्ती;]

(ड) कोणत्याही विषयात व एकूण अंतिम परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी तसेच कोणत्याही विषयात सूट, विशेष योग्यता (Credit) व विशेष प्राविण्य (Distinction) मिळविण्यासाठी आवश्यक असलेले गुण;

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ च्या कलम ४ अन्वये "निकटपूर्ववर्ती कलमान्वये" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम ७ अन्वये खंड (क) हा दाखल करण्यात आला.

(इ) अंतिम परीक्षांसाठी प्रवेश फी व त्या परीक्षांच्या संबंधात असलेल्या इतर बाबींबाबत द्यावयाची इतर फी व आकार;

(फ) विभागीय मंडळांनी अंतिम परीक्षा चालवण्याची व निकाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणे;

(ग) परीक्षकांची नेमणूक, अंतिम परीक्षासंबंधातील त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांचे पारिश्रमिक;

(ह) परीक्षकांच्या अर्हता व निरर्हता;

(आय) प्रमाणपत्रे देणे;

(ज) राज्य मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांची राज्य मंडळाच्या व विभागीय मंडळांच्या कार्यालयात नेमणूक करणे व त्यांच्या सेवेच्या शर्ती;

(के) राज्य मंडळाच्या उक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी भविष्य निर्वाह निधी उभारणे;

(ल) राज्य मंडळाच्या सर्व वित्तीय बाबींचे नियंत्रण, प्रशासन, अभिरक्षा व व्यवस्थापन;

(म) [1][राज्य मंडळ] ज्या तारखेपूर्वी व ज्या रीतीने अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील ती तारीख व ती रीत;

[2][(म-१) मंडळांच्या व त्यांनी नेमलेल्या समित्यांच्या सदस्यांना मिळावयाचा भरपाई भत्ता;]

(न) या अधिनियमखाली विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेल्या कोणत्याही विनियमास राज्य शासन मंजुरी देईतोपर्यंत तो विनियम अंमलात येणार नाही.

३७. [3][(१) लगतपूर्वीच्या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, पहिले विनियम हे राज्य शासन करील आणि नवीन विनियम रीतसर तयार करण्यात येईतोपर्यंत व उक्त कलमान्वये त्यास मंजुरी मिळेतोपर्यंत ते अंमलात राहतील. पहिले विनियम.

[4][(२) जर राज्य शासनास कोणत्याही वेळी असे वाटेल की, कलम ३६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणतेही नवीन विनियम करणे इष्ट आहे किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या किंवा कलम ३६ अन्वये राज्य मंडळाने केलेल्या कोणत्याही विनियमांमध्ये फेरबदल करणे किंवा ते पूर्णत: किंवा अंशत: निरसित करणे इष्ट आहे तर राज्य शासनास, राज्य मंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे विनियम करता येतील किंवा त्यात फेरबदल करता येतील किंवा असे विनियम एकतर पूर्णत: किंवा अंशत: निरसित करता येतील; याप्रमाणे तयार केलेले, फेरबदल केलेले किंवा निरसित केलेले विनियम, राज्य शासन अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा तारखेपासून किंवा अशी कोणतीही तारीख विनिर्दिष्ट करण्यात आली नसेल तर शासकीय राजपत्रातील अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून, अशा तारखेपूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वगळलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीत असेल ते खेरीजकरून अंमलात येतील.]

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १९ (अ) अन्वये ' 'मंडळांनी'' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १९ (ब) अन्वये हा खंड बदली दाखल अकरण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २० अन्वये कलम ३७ ला पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व पोटकलम (१) नंतर पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[4] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २० अन्वये कलम ३७ ला पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व पोट-कलम (१) नंतर पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

उप-विधी करण्याचा राज्य मंडळाचा अधिकार.

३८. राज्य मंडळास पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात तरतूद करण्यासाठी या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या विनियमांशी सुसंगत असतील असे उप-विधी करता येतील :—

(अ) राज्य मंडळाच्या आणि विभागीय मंडळाच्या व त्यापैकी कोणत्याही मंडळाने नेमलेल्या समित्यांच्या सभांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती व अशा सभांमध्ये गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्यांची संख्या.

[1] * * * * *

(क) या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांत ज्याबाबत तरतूद केलेली नसेल अशी केवळ मंडळांशी आणि त्यांच्या समित्यांशी संबंधित असलेली इतर कोणतीही बाब.

शंका उपस्थित झाल्याच्या बाबतीत निर्वचन.

३९. हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही विनियम किंवा उप-विधी यांच्या कोणत्याही तरतुदींच्या निर्वचनासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, ती बाब, निर्णयासाठी राज्य शासनाकडे निर्देशित करता येईल, आणि मंडळाच्या सदस्यांपैकी निदान तीन सदस्यांनी तशी मागणी केल्यास, ती बाब याप्रमाणे निर्णयासाठी राज्य शासनाकडे निर्देशित करण्यात येईल. राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

निरसन व व्यावृत्ती.

४०. (१) नेमलेल्या दिवशी—

(अ) मुंबई माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अधिनियम, १९४८, आणि — १९४८ चा मुंबई ४९.

(ब) मध्यप्रदेश माध्यमिक शिक्षण अधिनियम, १९५१; — १९५१ चा मध्यप्रांत १

हे निरसित होतील, आणि त्याखाली रचना केलेली महाराष्ट्र माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळ आणि विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळ ही (ज्यांचा यापुढे या कलमात "विसर्जित मंडळे" असा निर्देश करण्यात आला आहे) विसर्जित झालेली असतील आणि उक्त मंडळाचे सर्व सदस्य अधिकारपदे रिकामी करतील.

(२) उक्त अधिनियम निरसित करण्यात आले असले तरीही—

(अ) विसर्जित मंडळांची सर्व जंगम व स्थावर मालमत्ता आणि सर्व हक्क, कोणत्याही प्रकारचे हितसंबंध, अधिकार व विशेषाधिकार हे, नेमलेल्या दिवशी, राज्य मंडळाकडे हस्तांतरित झालेले असतील आणि त्यांचे आणखी हस्तांतरण न होता ते, राज्य मंडळामध्ये निहित होतील आणि त्यानंतर ज्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी राज्य मंडळाची रचना करण्यात आली असेल त्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी त्यांचे उपयोजन करण्यात येईल ;

(ब) विसर्जित मंडळांनी स्वीकारलेली किंवा त्यांना मिळालेली धर्मादाने ही, राज्य मंडळाने या अधिनियमाखाली स्वीकारली असल्याचे किंवा ती त्यास मिळाली असल्याचे मानण्यात येईल, आणि ज्या शर्तींवर अशी धर्मादाने स्वीकारण्यात आली असतील किंवा मिळाली असतील त्या सर्व शर्ती, या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्या तरीही, या अधिनियमाखाली विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल ;

(क) विसर्जित मंडळांच्या प्रीत्यर्थ कोणतेही मृत्युपत्रितदान, दान, अठी, किंवा विश्वस्तव्यवस्था यांचा ज्यात समावेश आहे असे, नेमलेल्या दिवसापूर्वी करण्यात आलेले कोणतेही मृत्युपत्र, विलेख किंवा इतर दस्तऐवज यांचा अर्थ, जणू त्यामध्ये नेमलेल्या दिवशी व त्या दिवसापासून विसर्जित मंडळाऐवजी राज्य मंडळाचे नाव दाखल करण्यात आले असावे त्याप्रमाणे लावण्यात येईल ;

(ड) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी, ज्यांना मान्यता दिलेली असेल व विसर्जित मंडळाचे विशेषाधिकार ज्यांना प्रदान करण्यात आले असतील अशा सर्व परिसंस्था या, अशी मान्यता किंवा असे विशेषाधिकार या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा त्याखाली ज्या मर्यादेपर्यंत परत घेण्यात, निर्बंधित करण्यात किंवा त्यांत फेरफार करण्यात येतील तेवढा खेरीज करून, या अधिनियमाखाली स्थापन करण्यात आलेल्या तत्सम विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या व त्यांचे विशेषाधिकार प्रदान करण्यात आलेल्या परिसंस्था असल्याचे मानण्यात येईल ;

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २१ अन्वये खंड (ब) वगळण्यात आला.

(इ) नेमलेल्या दिवसापूर्वी पत्करण्यात आलेली आणि कोणत्याही विसर्जित मंडळाच्या नावे कायदेशीरपणे अस्तित्वात असलेली सर्व ऋणे, दायित्वे व आबंधने यांची फेड व पूर्तता राज्य मंडळ करील ;

(फ) कोणत्याही अधिनियमितीत किंवा एखाद्या अधिनियमितीअन्वये काढण्यात आलेल्या इतर संलेखांमध्ये विसर्जित मंडळासंबंधी असलेले सर्व उल्लेख हे यथास्थिति, राज्य मंडळ किंवा तत्सम विभागीय मंडळ याबाबतचे उल्लेख आहेत असा अर्थ लावण्यात येईल ;

(ग) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी महाराष्ट्र माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळाच्या सेवेत असलेले राज्य शासनाचे सर्व अधिकारी व कर्मचारी (वर्ग एक व वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त) हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, उक्त तारखेपासून राज्य मंडळाच्या सेवेत घेण्यात येतील व त्यांची नेमणूक करण्यात येईल आणि त्यांना सामावून घेण्याच्या व त्यांच्या ज्येष्ठतेच्या संबंधात राज्य शासनाने काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीनतेने ते, या अधिनियमाखालील सक्षम प्राधिकारी सेवा शर्तींमध्ये रीतसर फेरबदल करीतोपर्यंत बदललेल्या परिस्थितीअनुसार शक्य असेल त्याप्रमाणे, त्यांच्या सेवेच्या त्याच शर्तींवर आपले अधिकारपद धारण करण्याचे चालू ठेवतील :

परंतु, अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या संबंधात, नेमलेल्या दिवसाच्या निकट-पूर्वी, लागू असणाऱ्या सेवेच्या शर्तींमध्ये, राज्य शासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय, त्याला अहितकारक होईल अशा रीतीने फेरबदल करता येणार नाही:

परंतु आणखी असे की, अशा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने राज्य शासनाच्या अधीन केलेली कोणतीही सेवा ही, राज्य मंडळाकडे केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.

या परिच्छेदाच्या पूर्ववर्ती तरतुदींमधील कोणतीही गोष्ट, राज्य मंडळाने आपल्या सेवेत घ्यावयाच्या किंवा घेतलेल्या आणि ज्याने नेमलेल्या दिवशी किंवा राज्य शासन निर्धारित करील अशा नंतरच्या तारखेस राज्य शासनाला लेखी नोटिशीद्वारे त्या मंडळाचा अधिकारी किंवा कर्मचारी होण्याची किंवा चालू राहण्याची आपली इच्छा नसल्याचे कळविले असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास लागू होणार नाही; व लागोलाग त्यास शासकीय सेवेतून निवृत्त होण्यास परवानगी देण्यात येईल, तसेच त्यास भरपाई, निवृत्तिवेतन, उपदान किंवा राज्य शासन निर्धारित करील असे त्यासारखे सेवांत लाभ मिळण्याचा हक्क असेल (असे सेवांत लाभ हे, नेमलेल्या दिवशी त्याची राज्य शासनाकडील सेवा बंद झाल्यानंतर त्यास जे लाभ मिळाले असते त्या लाभांहून कमी हितकारक असणार नाहीत) ·

(ह) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळाने रीतसर नेमलेले व त्याच्या सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य मंडळाने नेमलेल्या दिवशी नेमलेले अधिकारी व कर्मचारी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांना समावून घेण्याच्या व त्यांच्या ज्येष्ठतेच्या संबंधात राज्य शासनाने काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीनतेने, ते, या अधिनियमाखालील सक्षम प्राधिकारी सेवा शर्तींमध्ये फेरबदल करीतोपर्यंत बदल-लेल्या परिस्थितीनुसार शक्य असेल त्याप्रमाणे त्यांच्या सेवेच्या त्याच शर्तींवर आपले अधिकारपद धारण करण्याचे चालू ठेवतील :

परंतु, अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या बाबतीत, नेमलेल्या दिवसाच्या निकट-पूर्वी लागू असणाऱ्या सेवेच्या शर्तींमध्ये, राज्य शासनाची पूर्वसंमती घेतल्याशिवाय त्याला अहितकारक होईल अशा रीतीने फेरबदल करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, अशा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने उक्त मंडळाकडे केलेली कोणतीही सेवा ही, राज्य मंडळाकडे केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.

४१. दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींची उक्त अनुसूचीच्या चौथ्या स्तंभामध्ये उल्लेख केलेल्या व्याप्तीपर्यंत आणि त्या रीतीने याद्वारे सुधारणा करण्यात येत आहे. **विवक्षित अधिनियमितींच्या सुधारणा.**

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.** ४२. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या कामात जर कोणतीही अडचण उद्‌भवेल तर, राज्य शासनाला, उक्त अडचण दूर करण्यासाठी, आवश्यक किंवा इष्ट वाटेल आणि अशा तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, आदेशाद्वारे करता येईल :

परंतु नेमलेल्या दिवसापासून दोन वर्षांचा अवधी संपल्यानंतर, या कलमाखाली कोणताही आदेश काढता येणार नाही.

[१] [पहिली अनुसूची

[कलम २ चे खंड (इ) व कलम ३-अ पहा]

| अनुक्रमांक | विभागाचे नाव | | क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) |
| १ | मुंबई विभाग | .. | (१) मुंबई शहर जिल्हा |
| | | | (२) मुंबई उपनगर जिल्हा |
| | | | (३) ठाणे जिल्हा |
| | | | (४) रायगड जिल्हा |
| | | | (५) रत्नागिरी जिल्हा |
| | | | (६) सिंधुदुर्ग जिल्हा. |
| २ | पुणे विभाग | .. | (१) धुळे जिल्हा |
| | | | (२) जळगाव जिल्हा |
| | | | (३) नाशिक जिल्हा |
| | | | (४) अहमदनगर जिल्हा |
| | | | (५) कोल्हापूर जिल्हा |
| | | | (६) पुणे जिल्हा |
| | | | (७) सांगली जिल्हा |
| | | | (८) सातारा जिल्हा |
| | | | (९) सोलापूर जिल्हा |
| ३ | नागपूर विभाग | .. | (१) अकोला जिल्हा |
| | | | (२) अमरावती जिल्हा |
| | | | (३) भंडारा जिल्हा |
| | | | (४) बुलढाणा जिल्हा |
| | | | (५) चंद्रपूर जिल्हा |
| | | | (६) गडचिरोली जिल्हा |
| | | | (७) नागपूर जिल्हा |
| | | | (८) यवतमाळ जिल्हा |
| | | | (९) वर्धा जिल्हा. |
| ४ | औरंगाबाद विभाग | .. | (१) औरंगाबाद जिल्हा |
| | | | (२) परभणी जिल्हा |
| | | | (३) बीड जिल्हा |
| | | | (४) नांदेड जिल्हा |
| | | | (५) उस्मानाबाद जिल्हा |
| | | | (६) जालना जिल्हा |
| | | | (७) लातूर जिल्हा ] |

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १० अन्वये ही अनुसूची बदली दाखल करण्यात आली.

## [1] [दुसरी अनुसूची]
(कलम ४१ पहा)

| वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव | सुधारणांची व्याप्ती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १९६७ .. | २३ | महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७. | कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "१–पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखाली "प्रवर्ग ब" या उप-शीर्षकाखालील खंड (बारा) मध्ये "राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९६९ ... | ९ | पंजाबराव कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६८. | कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "१–पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील "प्रवर्ग ब" या उप-शीर्षकाखालील खंड (बारा) मध्ये, "राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९७२ .. | १७ | मराठवाडा कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२. | कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "१–पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील "प्रवर्ग ब" या उपशीर्षकाखालील खंड (बारा) मध्ये, "राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९७२ .. | १८ | कोकण कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२. | कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "१– पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील "प्रवर्ग ब" या उपशीर्षकाखालील खंड (बारा) मध्ये, "राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९७४ .. | २२ | मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९७४. | १. कलम २० च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (अ) मध्ये खंड (आठ) व (नऊ) या ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :— "(आठ) सभापती, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ," २. कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील खंड (चार) मध्ये, "राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २२ अन्वये मूळ अनुसूचीऐवजी दुसरी अनुसूची दाखल करण्यात आली.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | ३. कलम ५३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—<br><br>सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक सहा याच्या प्रारंभानंतर विद्यार्थ्यांची नाव नोंदणी.<br><br>"५३-अ.—कलम ५३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९७६, याच्या प्रारंभा-नंतर कोणत्याही वेळी, तीन वर्षांच्या पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी किंवा अभियांत्रिकी, वैद्यकीय अथवा तशाच कोणत्याही पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नावनोंदणी व्हावयाचा कोणताही विद्यार्थी,— [१९७७ चा महा. ६.]<br><br>(एक) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ याखाली स्थापन केलेल्या विभागीय मंडळांकडून चालविण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ; [१९६५ चा महा. ४१.]<br><br>(दोन) राज्य शासनाच्या संमतीने जी प्रवेश परीक्षा विद्यापीठाकडून सुरू करण्यात येईल व विहित विषयांची आणि विहित रीतीने घेण्यात येईल अशी कोणतीही प्रवेश परीक्षा असल्यास ती ;<br><br>(तीन) वर नमूद केलेल्या परीक्षांशी तुल्य म्हणून विहित केलेली इतर कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा; किंवा<br><br>(चार) विहित केलेल्या असतील अशा इतर अर्हता त्याने धारण केलेल्या असाव्यात". |
| १९७४ | .. | २३ पुणे विद्यापीठ अधिनियम, १९७४. | १. कलम २० च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (अ) मध्ये खंड (आठ) व (नऊ) याऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br><br>"(आठ) सभापती, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ";<br><br>२. कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील खंड (चार) मध्ये "राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | ३. कलम ५३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—<br>"५३-अ. कलम ५३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या प्रारंभा-नंतर कोणत्याही वेळी, तीन वर्षांच्या पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी, किंवा अभियांत्रिकी, वैद्यकीय किंवा तशाच प्रकारच्या कोणत्याही पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नाव नोंदणी व्हावयाचा कोणताही विद्यार्थी,—<br>(एक) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ याखाली स्थापन केलेल्या विभागीय मंडळाकडून चालविण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाण-पत्र परीक्षा ;<br>(दोन) राज्य शासनाच्या संमतीने जी विद्यापीठाकडून सुरू करण्यात येईल व विहित विषयांची आणि विहित रीतीने घेण्यात येईल अशी कोणतीही प्रवेश परीक्षा असल्यास ती ;<br>(तीन) वर नमूद केलेल्या परीक्षांना तुल्य म्हणून विहित केलेली इतर कोणतीही परीक्षा;<br>उत्तीर्ण झालेला असावा; किंवा<br>(चार) विहित केलेल्या अनतील अशा इतर अर्हता त्याने धारण केलेल्या असाव्यात". |
| १९७४ .. | २४ | शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४. | १. कलम २० च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (अ) मध्ये खंड (आठ) व (नऊ) याऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br>"(आठ) सभापती, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,"<br>२. कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील खंड (चार) मध्ये, "राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ च्या प्रारंभानंतर विद्यार्थ्यांची नाव नोंदणी.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | ३. कलम ५३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— |
| | | सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या प्रारंभानंतर विद्यार्थ्यांची नाव नोंदणी. | "५३-अ.—कलम ५३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी, तीन वर्षांच्या पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी, किंवा अभियांत्रिकी, वैद्यकीय किंवा तशाच कोणत्याही पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नाव नोंदणी व्हावयाचा कोणताही विद्यार्थी,— (१९७७ चा महा. ६.)<br><br>(एक) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ याखाली स्थापन केलेल्या विभागीय मंडळाकडून चालविण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ; (१९६५ चा महा. ४१.)<br><br>(दोन) राज्य शासनाच्या संमतीने जी प्रवेश परीक्षा विद्यापीठाकडून सुरू करण्यात येईल व विहित विषयांची आणि विहित रीतीने घेण्यात येईल अशी कोणतीही प्रवेश परीक्षा असल्यास ती ;<br><br>(तीन) वर नमूद केलेल्या परीक्षांना तुल्य म्हणून विहित केलेली इतर कोणतीही परीक्षा,<br><br>उत्तीर्ण झालेला असावा; किंवा<br><br>(चार) विहित केलेल्या असतील अशा इतर अर्हता त्याने धारण केलेल्या असाव्यात." |
| १९७४ | .. २५ | मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९७४. | १. कलम २० च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (अ) मध्ये खंड (आठ) व (नऊ) याऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br><br>"(आठ) सभापती, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,"<br><br>२. कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील खंड (चार) मध्ये, "राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | ३. कलम ५३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—<br><br>१९६५ चा महा. ६.<br><br>"५३-अ.—कलम ५३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या प्रारंभानंतर, कोणत्याही वेळी तीन वर्षांच्या पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी, किंवा अभियांत्रिकी, वैद्यकीय अथवा तशाच कोणत्याही पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नावनोंदणी व्हावयाचा कोणताही विद्यार्थी,— **सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ च्या प्रारंभानंतर विद्यार्थ्यांची नावनोंदणी.**<br><br>१९६५ चा महा. ४१.<br><br>(एक) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ याखाली स्थापन केलेल्या विभागीय मंडळाकडून चालविण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ;<br><br>(दोन) राज्य शासनाच्या संमतीने जी विद्यापीठाकडून सुरू करण्यात येईल व विहित विषयांची आणि विहित रीतीने घेण्यात येईल अशी कोणतीही प्रवेश परीक्षा असल्यास ती ;<br><br>(तीन) वर नमूद केलेल्या परीक्षांशी तुल्य म्हणून विहित केलेली इतर कोणतीही परीक्षा; उत्तीर्ण झालेला असावा; किंवा<br><br>(चार) विहित केलेल्या असतील अशा इतर अर्हता त्याने धारण केलेल्या असाव्यात". |
| १९७४ .. | २६ | नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९७४. | १. कलम २० च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (अ) मध्ये खंड (आठ) व (नऊ) याऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br><br>"(आठ) सभापती, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ;"<br><br>२. कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील खंड (चार) मध्ये, "राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | ३. कलम ५३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— |
| सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ च्या प्रारंभानंतर विद्यार्थ्यांची नावनोंदणी. | | | "५३-अ.—कलम ५३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी तीन वर्षांच्या पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी किंवा अभियांत्रिकी, वैद्यकीय अथवा तशाच कोणत्याही पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नावनोंदणी व्हावयाचा कोणताही विद्यार्थी,— १९७७ चा महा. ६.<br><br>(एक) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ याखाली स्थापन केलेल्या विभागीय मंडळाकडून चालविण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ; १९६५ चा महा. ४१.<br><br>(दोन) राज्य शासनाच्या संमतीने जी विद्यापीठाकडून सुरू करण्यात येईल व विहित विषयांची आणि विहित रीतीने घेण्यात येईल अशी कोणतीही प्रवेश परीक्षा असल्यास ती ;<br><br>(तीन) वर नमूद केलेल्या परीक्षांशी तुल्य म्हणून विहित केलेली इतर कोणतीही परीक्षा, उत्तीर्ण झालेला असावा ; किंवा<br><br>(चार) विहित केलेल्या असतील अशा इतर अर्हता त्याने धारण केलेल्या असाव्यात" |
| १९७४ | .. | २७ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९७४. | १. कलम २० च्या पोट-कलम (१) मध्ये "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (अ) मध्ये खंड (आठ) व (नऊ) या ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br><br>"(आठ) सभापती, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ; "<br><br>२. कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये, "पदसिद्ध सदस्य" या शीर्षकाखालील खंड (चार) मध्ये, "राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" या मजकुराऐवजी "राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | ३. कलम ५३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— |

१९७७ चा महा. ६.

"५३-अ.—कलम ५३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी, तीन वर्षांच्या पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी, किंवा अभियांत्रिकी, वैद्यकीय अथवा तशाच कोणत्याही पदवी पाठ्यक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणून नावनोंदणी व्हावयाचा कोणताही विद्यार्थी,—

**सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ च्या प्रारंभानंतर विद्यार्थ्यांची नावनोंदणी.**

१९६५ चा महा. ४१.

(एक) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ याखाली स्थापन केलेल्या विभागीय मंडळाकडून चालविण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ;

(दोन) राज्य शासनाच्या संमतीने जी विद्यापीठाकडून सुरू करण्यात येईल व विहित विषयांची आणि विहित रीतीने घेण्यात येईल अशी कोणतीही प्रवेश परीक्षा असल्यास ती ;

(तीन) वर नमूद केलेल्या परीक्षांशी तुल्य म्हणून विहित केलेली इतर कोणतीही परीक्षा; उत्तीर्ण झालेला असावा; किंवा

(चार) विहित केलेल्या असतील अशा इतर अर्हता त्याने धारण केलेल्या असाव्यात".

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

शामुना—ए-१२६५—मासंमरामुं—२—८९—३,०८५—पीसी४*

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- संचालक

मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
महाराष्ट्र राज्य
नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
दूरध्वनी : ८११८६९३ व ८११९१४८

- पर्यवेक्षक

शासकीय ग्रंथागार
(केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)
(फक्त स्थानिक विक्रीकरिता)
युसुफ बिल्डिंग, दुसरा मजला, खो. नं. २१
वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ)
मुंबई ४०० ००१
दूरध्वनी : २०४९५९४.

- व्यवस्थापक

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी. पी. ओ. नजिक, पुणे ४११ ००४
दूरध्वनी : २०२४८.

- व्यवस्थापक

शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
दूरध्वनी : २२६१५

- पर्यवेक्षक

शासकीय ग्रंथागार
शहागंज, गांधी चौकाजवळ,
औरंगाबाद ४३१ ००१
दूरध्वनी : ५५२५
आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते